आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

६ ऑक्टोबर २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्रासह ८ नक्षलप्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक उद्या केंद्रीय गृह मंत्र्यांच्या  अध्यक्षतेखाली होणार
- केंद्र सरकारचा प्रत्येक निर्णय आणि धोरण विकसित भारताचं ध्येय पूर्ण करण्यासाठी समर्पित असून शेतकरी हा या दृष्टिकोनाचा मुख्य आधार असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन
- मुंबईतल्या कुलाबा- वांद्रे- सीप्झ मेट्रो ३चा  आरे ते बीकेसीपर्यंतचा टप्पा येत्या मंगळवारपासून प्रवाशांसाठी खुला

  **आणि**
- चेंबूर आग दुर्घटनेतल्या मृतांच्या वारसांना प्रत्येकी ५ लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर

**<><><><><>**

देशातल्या नक्षलप्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक उद्या नवी दिल्ली इथं केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, झारखंड, तेलंगणा, ओदिशा, आणि मध्य प्रदेश, या राज्यांचे मुख्यमंत्री या बैठकीला उपस्थित राहतील.

या राज्यांना विकास निधी प्रदान करण्यात सक्रीय सहभाग असलेले पाच केंद्रीय मंत्री देखील या बैठकीला उपस्थित राहतील. तसंच उप राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आणि केंद्र, राज्ये आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाचे (CAPF) वरिष्ठ अधिकारी देखील या चर्चेत सहभागी होतील.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

६ ऑक्टोबर २०२४ - रविवार

**<><><><><>**

केंद्र सरकारचा प्रत्येक निर्णय आणि धोरण विकसित भारताचं ध्येय पूर्ण करण्यासाठी समर्पित असून शेतकरी हा या दृष्टिकोनाचा मुख्य आधार आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल महाराष्ट्रात वाशिम इथं एका कार्यक्रमात केलं. कृषी आणि पशुसंवर्धन क्षेत्राशी संबंधित जवळपास २३ हजार कोटी रुपयांच्या उपक्रमांचा प्रारंभ प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. भटक्या जमाती आणि समुदायांच्या विकासासाठीही सरकार वचनबद्ध असल्याचं ते यावेळी म्हणाले. वाशिम जिल्ह्यातल्या पोहरादेवी इथं बंजारा समाजाच्या समृद्ध परंपरेचं दर्शन घडविणाऱ्या बंजारा विरासत संग्रहालयाचं उद्घाटनही काल प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. या संग्रहालयाबद्दल अधिक माहिती आमच्या वाशिमच्या वार्ताहराकडून

**होल्ड--व्हाईस कास्ट-वाशिम**

यावेळी मोदींच्या हस्ते शेतकरी सन्मान निधीच्या १८ व्या हप्त्यापोटी सुमारे २० हजार कोटी रुपयांची रक्कम देशभरातील जवळपास साडे नऊ कोटी शेतकऱ्यांना वितरित करण्यात आली. त्याचवेळी राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान योजनेअंतर्गत १९ शे कोटी रुपयांच्या मदतीचंही राज्यातल्या ९० लाख शेतकऱ्यांना त्यांच्या हस्ते वाटप करण्यात आलं.

याशिवाय ९ हजार दोनशे कृषी उत्पादक संघटनांसह १ हजार ९२० कोटी रुपये खर्चाच्या साडे सात हजार कृषी पायाभूत निधी प्रकल्पांचं तसंच १६ हजार मेगावॅट क्षमतेच्या जगातील सर्वात मोठ्या विकेंद्रित सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पातल्या पहिल्या पाच सौर उद्यानांचं लोकार्पण मोदी यांच्या हस्ते पोहरादेवी इथं करण्यात आलं.

**<><><><><>**

एक देश एक निवडणूक पद्धतीचा भारताला खूप मोठा फायदा होईल असं प्रतिपादन माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी केलं आहे. ते काल नवी दिल्ली एक देश एक निवडणूक या विषयावर ३० व्या लाल बहादूर शास्त्री स्मृती व्याख्यानात बोलत होते. एक देश एक निवडणूक पद्धतीमुळे उत्तम प्रशासन, धोरणात्मक स्थिरता, सामाजिक एकोपा, आर्थिक वाढ आणि जागतिक स्पर्धात्मकता वाढेल असंही कोविंद यांनी यावेळी सांगितलं. एकाच वेळी निवडणूक घेतल्यास अधिक समावेशक आणि समृद्ध भविष्यासाठी मूलभूत सुधारणा होण्यास मदत होणार आहे. कोविंद यांच्या नेतृत्वाखालील समितीने या संदर्भातील अहवाल नुकताच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे सादर केला होता.

**<><><><><>**

जम्मू काश्मीर आणि हरियाणा विधानसभा निवडणुकीची मतमोजणी येत्या मंगळवारी होणार असून मतमोजणी सुरळीत पार पडण्यासाठी सर्व केंद्रावर कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. कलम ३७० रद्द केल्यानंतर जम्मू काश्मीरमध्ये होणारी ही पहिलीच निवडणूक आहे. हरियाणामध्ये, वेगवेगळ्या जिल्ह्यांतल्या स्ट्राँग रूममध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली आणि कडक सुरक्षा व्यवस्थेत ठेवण्यात आली आहेत. मतमोजणीच्या दिवशी निवडणूक अधिकारी, उमेदवार आणि निरीक्षकांच्या उपस्थितीत स्ट्राँग रूम उघडण्यात येणार आहे.

**<><><><><>**

कमी अंतरावर लक्ष्यभेद करण्यासाठीच्या ४ क्षेपणास्त्रांची चाचणी काल राजस्थानात पोखरण इथं यशस्वी झाली. गेल्या दोन दिवसांमध्ये ही चाचणी पार पडली. क्षेपणास्त्रांची चाचणी यशस्वी केल्याबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी डीआरडीओ, लष्कर आणि या चाचणीत सहभागी असणाऱ्या सर्वांचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

मुंबईतल्या कुलाबा- वांद्रे- सीप्झ मेट्रो ३ चं उद्घाटन काल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं. या भुयारी मेट्रोचा आरे ते बीकेसीपर्यंतचा टप्पा प्रवाशांसाठी खुला करण्यात आला असून, सकाळी ११ वाजता या मार्गावरची सेवा सुरू झाली. ही मेट्रो सेवा येत्या मंगळवारपासून, सोमवार ते शनिवार दररोज सकाळी साडेसहा ते रात्री साडे दहा, तर रविवारी सकाळी साडे आठ ते रात्री साडे दहा पर्यंत सुरू रहाणार आहे. या मेट्रोमुळे प्रवाशांना आरे, जेव्हीएलआर, सीप्झ, एमआयडीसी अंधेरी, मरोळ नाका, विमानतळ टी१, सांताक्रूझ, वांद्रे शासकीय वसाहत आणि बीकेसी अशा प्रमुख ठिकाणी सहज पोहोचता येणार आहे.

**<><><><><>**

मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाअंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचा सन्मान आणि राज्यस्तरीय विविध योजनांचा लोकार्पण सोहळा आज छत्रपती संभाजीनगर इथं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत होत आहे. या कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य पोलिस पाटील संघटनेच्या राज्यस्तरीय मेळाव्याला उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम दुपारी ४ वाजता हर्सूल सावंगी परिसरात आयोजित केला आहे.

**<><><><><>**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेत ८०० लाभार्थी भाविकांची पहिली विशेष रेल्वे आज सकाळी ११ च्या सुमाराला अयोध्येकडे राममंदिर दर्शनासाठी रवाना झाली. रेल्वेस्थानकावर पालकमंत्री अब्दुल सत्तार, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी रेल्वेला हिरवा झेंडा दाखवला. आज अयोध्येला पहिली विशेष रेल्वे सोडण्यात आली. यापुढं चारधाम, बौद्धगया, अजमेर

अशा विविध धार्मिक स्थळांच्या भेटीला ६० वर्षांवरील नागरिकांना या योजनेतून संधी मिळणार आहे. ही योजना सर्वधर्मीयांसाठी असल्याचं यावेळी पालकमंत्री सत्तार म्हणाले. यावेळी शिक्षक आमदार विक्रम काळे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांची उपस्थिती होती.

<><><><><>

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विविध प्रवर्गातल्या संचालकांच्या १८ पदांसाठी होणाऱ्या निवडणुकीकरता येत्या १३ ऑक्टोबरपर्यंत नामनिर्देशपत्रं स्वीकारली जाणार आहेत. १४ ऑक्टोबरला अर्जांची छाननी केली जाणार असून त्यानंतर २९ ऑक्टोबरला ३ वाजेपर्यंत उमेदवारी मागे घेण्याची मुदत आहे. मतदान १० नोव्हेंबरला होणार असून ११ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

<><><><><>

मुंबईत चेंबूर इथं सिद्धार्थ कॉलनी परिसरात आज पहाटे एका दुमजली इमारतीला लागलेल्या भीषण आगीत एकाच कुटुंबातल्या सात जणांचा होरपळून मृत्यू झाला, तर अन्य दोन जण गंभीररीत्या होरपळले आहेत. इमारतीच्या तळमजल्यावर विजेच्या तारांजवळ शॉर्टसर्किट झाल्याने ही आग लागल्याचं अग्निशमन दल अधिकाऱ्यांनी सांगितलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घटनास्थळी भेट दिली आणि प्रशासकीय अधिकाऱ्याकडून घटनेची माहिती घेतली. दुर्घटनेत मरण पावलेल्यांच्या वारसांना प्रत्येकी पाच लाख रुपये अर्थसहाय्य तसेच दोन जखमींच्या उपचाराचा खर्च शासन करेल असं त्यांनी जाहीर केलं. या घटनेची उच्च स्तरीय चौकशी केली जाणार असून पुन्हा असे प्रकार घडू नयेत यासाठी काळजी घेतली जाईल, असे ते म्हणाले. यावेळी पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

संयुक्त अरब अमिरातीत  सुरू असलेल्या महिलांच्या २० षटकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना पाकिस्तान संघाविरुद्ध दुबईत होणार आहे. दुपारी साडेतीन वाजता हा सामना सुरू होईल. विजेतेपदाच्या शर्यतीत राहण्यासाठी भारतीय संघाला आज विजय मिळवणं आवश्यक आहे.

पुरुषांच्या क्रिकेटमध्ये आज भारत आणि बांग्लादेश यांच्यादरम्यान तीन सामन्यांच्या मालिकेतला पहिला टी ट्वेंटी सामना ग्वाल्हेर इथं होणार आहे. संध्याकाळी ७ वाजता खेळ सुरू होईल. नवोदित वेगवान गोलंदाज मयंक यादव याला या सामन्यात पदार्पणाची संधी मिळण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

मलेशियात होणाऱ्या बाराव्या सुल्तान ऑफ जोहोर चषक हॉकी स्पर्धेसाठी भारताचा पुरुष ज्युनियर संघ जाहीर झाला आहे. या संघाचा कर्णधार अमिर असून उप कर्णधार रोहित असेल. तर  पी आर श्रीजेश हे मुख्य प्रशिक्षक असतील. भारतीय संघाचा पहिला सामना १९ ऑक्टोबर रोजी जपानशी होणार असून भारतीय संघ दुसऱ्या दिवशी ब्रिटनशी लढत देईल. २२ ऑक्टोबरला मलेशिया आणि २३ ऑक्टोबरला ऑस्ट्रेलियाच्या संघाशी भारतीय संघाचा सामना होणार आहे.

**<><><><><>**

वाशिम जिल्ह्यातले संत सेवालाल महाराजांचे चौथे वंशज नामदेव हंजारी महाराज यांचं काल पोहरादेवी इथं निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते. नामदेव हंजारी महाराजांच्या निधनामुळे बंजारा समाजावर शोककळा पसरली आहे.